**ठळक बातम्या**

- विकसित कृषी संकल्प अभियानाला राज्यासह देशभरात सुरुवात

- गेल्या आर्थिक वर्षात राज्यात विक्रमी परकीय गुंतवणूक झाल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची माहिती

- आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचा समूह विमा काढला जाणार

- देशातलं अन्नधान्य उत्पादन ३५ कोटी ४० लाख टनापर्यंत पोहोचण्याचा अंदाज

**आणि**

- सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी ही भारतीय जोडी पुरुष दुहेरीच्या उपान्त्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ या देशव्यापी अभियानाला आज भुवनेश्वरच्या पुरी जिल्हातल्या साक्षीगोपाल इथून आरंभ झाला. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आणि ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी यांनी एक पेड माँ के नाम या मोहिमेसाठी एक रोप लावून अभियानाचं उद्घाटन केलं.

विकसित कृषी संकल्प अभियानाच्या माध्यमातून कृषी संशोधक आणि कृषी अधिकारी देशभरातल्या सातशे जिल्ह्यातल्या  दीड कोटी शेतकऱ्यांशी संवाद साधतील आणि त्यांना कृषी क्षेत्रातल्या आधुनिक संशोधनाबाबत माहिती देतील. या अभियानाच्या माध्यमातून तज्ज्ञांची २ हजार १७० पथकं देशातल्या ७२३ जिल्ह्यांमधल्या ६५ हजारपेक्षा जास्त गावांना भेट देणार आहेत. यात किमान चार वैज्ञानिक असतील. या अभियानाद्वारे देशातल्या सव्वा  कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलं आहे.

**<><><><>**

राज्यात परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातून आज विकसित कृषि संकल्प अभियानाला सुरुवात झाली. चित्ररथाला हिरवा झेंडा दाखवून

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अभियानाला सुरुवात केली. या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना खरीप पिकाच्या नियोजनासाठी अचूक मार्गदर्शन मिळेल, शेतकऱ्यांना  आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समितीच्या बैठकीचं उद्धाटन आज परभणीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत झालं. वातावरण बदलामुळे शेती पारंपरिक पद्धतीने करता येत नाही तिच्यात गुंतवणूक होणं आवश्यक आहे, मात्र ७९ टक्के शेतकरी अल्पभूधारक असल्याने त्याच्यात गुंतवणूक करण्याची क्षमता नाही. अशा दुष्टचक्रात शेतकरी अडकल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. या दुष्टचक्रामधून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी योजना आखून सरकार प्रयत्न करत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

वातावरण बदलाचा ताण सहन करणारं, नवनव्या रोगांच्या साथीत तगून राहणारं वाण तयार करणं आवश्यक आहे, त्यामुळे यासाठी संशोधन होणं गरजेचं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><>**

गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात १ लाख ६४ हजार ८७५ कोटी इतकी विक्रमी परकीय गुंतवणूक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. ही गुंतवणूक देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के इतकी आहे. त्याआधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही गुंतवणूक ३२ टक्के अधिक आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत २५ हजार ४४१ कोटी इतकी परकीय गुंतवणूक आली. राज्याची घोडदौडी अशीच सुरू राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी राज्यातल्या जनतेचं अभिनंदनही केलं.

**<><><><>**

आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचा समूह विमा काढला जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारीत येणाऱ्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या

अध्यक्षतेखाली काल बैठक झाली. त्याविषयी माहिती देताना शिंदे आज वार्ताहरांशी बोलत होते.

गेल्यावर्षीप्रमाणे या वर्षीही आरोग्य विभागाकडून आरोग्य शिबिरं आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, असं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

याशिवाय गेल्यावर्षी वारीत अपघाती मृत्यू आलेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत दिली जाईल, पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल, असंही त्यानी सांगितलं.

**<><><><>**

डोंगराळ प्रदेशांमध्ये दरड कोसळण्याच्या घटना रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची गरज केंद्रीय रस्ते वागतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ते आज नवी दिल्लीत डोंगर उतारांचं स्थिरीकरण आणि दरडी कोसळण्याला प्रतिबंध या विषयावर आयोजित परिषदेत बोलत होते. तंत्रज्ञानातली प्रगती ही प्रवाही गोष्ट आहे आणि तज्ज्ञांनी समस्या ओळखून योग्य उपाययोजना सुचवली पाहिजे, असं ते म्हणाले.

**<><><><>**

महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी आज राजभवन इथं महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. त्यावेळी राजभवनातले अधिकारी, कर्मचारी आणि पोलिस दलातले अधिकारी तसंच कर्मचारी उपस्थित होते.

**<><><><>**

सन २०२४-२५ मधे भारताचं अन्नधान्य उत्पादन ३५ कोटी ४० लाख टनापर्यंत पोहोचण्याचा अंदाज सरकारने वर्तवला आहे. हे उत्पादन २०२३-२४ पेक्षा ६ टक्क्याहून जास्त आहे. गहू, तांदूळ, मका, सोयाबीन, डाळी आणि शेंगदाणा या प्रमुख पिकांचा यात समावेश आहे. तांदूळ १ हजार ४९० लाख मेट्रिक टन, गहू १ हजार १५७ लाख मेट्रिक टन तसंच भरड धान्यामधे ५४ लाख मेट्रिक टनाची वाढ झाली आहे.

अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होत आहे, मात्र डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनाचा वेग वाढवण्याची गरज आहे, असं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. सरकारने शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीत वाढ केली तसंच खत वेळेवर उपलब्ध करून दिलं, त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली असं चौहान म्हणाले.

<><><><>

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी या जोडीनं आज उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी इंडोनेशियाच्या साबर कार्यमान गुटामा आणि मोह रेझा पेहलवी इस्फहानी या जोडीचा १९-२१, २१-१६, २१-१९ असा पराभव केला. पुढच्या फेरीत मलेशियाच्या बॅडमिंटनपटूंशी त्यांची गाठ पडेल. उपउपान्त्यपूर्व फेरीत पुरुष एकेरीत एच एस प्रणॉयला तर महिला एकेरीत पी व्ही सिंधूला पराभव पत्करावा लागला.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेतली पहिली क्वालिफायर लढत थोड्याच वेळात, साडेसात वाजता पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात होणार आहे. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. हा सामना मोहाली इथल्या महाराजा यादविंद्र सिंग स्टेडियममध्ये होत आहे.
उद्या होणारा एलिमेनिटर सामना गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात होईल. तीन जून रोजी स्पर्धेचा अंतिम सामना आहे.

<><><><>

वाढता आर्थिक राष्ट्रवाद आणि व्यापार शुल्कातल्या चढ-उतारामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेचे नकारात्मक पडसाद जागतिक आर्थिक स्थितीमधून उमटत असल्याचं जागतिक आर्थिक मंचाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात म्हटलं आहे. व्यापार क्षेत्र दबावाखाली राहिल्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी यंदाचं वर्ष लाभदायक ठरणार नाही, या शक्यतेवर जगातल्या प्रमुख अर्थतज्ज्ञांचं एकमत असल्याचं यात म्हटलं आहे. सध्याच्या भू-राजकीय घडामोडी जागतिक अर्थव्यवस्थेपुढे तात्पुरते अडथळे निर्माण करणार नाहीत,

तर महत्वाच्या संरचनात्मक बदलाचे संकेत देत असल्याचं तज्ज्ञांचं मत असल्याचं यात म्हटलं आहे.

<><><>

**रत्नागिरी** जिल्ह्यात वातावरण ढगाळ असून अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत आहेत, मात्र जिल्ह्यात पावसाचा जोर आता ओसरल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आज सकाळपर्यंत १२ पूर्णांक ८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.  सध्या जायकवाडी धरणात २९ पूर्णांक ७९ शतांश टक्के पाणीसाठा असल्याचं प्रशासनानं कळवलं आहे.

मान्सूनविषयी हवामान खात्याचा अंदाज लक्षात घेत संभाव्य पूरप्रवण क्षेत्र असल्यामुळे घेऊन सांगली जिल्ह्यात राज्य शासनाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचं पथक तैनात केलं आहे.  जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.

जालना शहरासह जिल्ह्यात संध्याकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस सुरु झाला.

<><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात काही ठिकाणी, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. या काळात किनारपट्टी भागात आणि विदर्भात सोसाट्याचा वारा वाहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><>//